# मेट्रो-३ चे भुयारीकरण विमानतळापर्यंत पोहोचले



**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे (मुं.मे.रे.कॉ) शुक्रवारी सहार रोड ते आंतरदेशीय विमानतळ स्थानक हा १.५ किमी इतका लांब ३६वा भुयारीकरणाचा टप्पा पूर्ण करण्यात आला. तापी-१ आणि तापी-२ या दोन टनेल बोअरिंग मशिन्स (टीबीएम) च्या मदतीने पॅकेज-६ ने एकूण ४.४ किमीचे भुयारीकरण पूर्ण केले आहे. पॅकेज-६ अंतर्गत आंतरदेशीय विमानतळ, आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि सहार रोड मेट्रो स्थानकांचा समावेश असून या पॅकेजमध्ये ४ भुयारीकरणाचे टप्पे पूर्ण झाले आहेत. त्यात आंतरराष्ट्रीय विमानतळ ते सहार रोड, सहार रोड ते आंतरदेशीय विमानतळ, मेट्रो-३ प्रकल्पाचे आतापर्यंत एकूण ५०.३ किमी (९३%) या टप्प्यांचा समावेश आहे.